# स्वभावदोष आणि अहं यांच्या विविध पैलूंचे विश्लेषण



## स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाची प्रक्रिया शिका आणि जीवन आनंदी बनवा !

‘स्वभावदोष आणि अहं हे ईश्वरप्राप्तीसाठीच्या साधनेतील दोन मोठे अडथळे आहेत. स्वभावदोष आणि अहं असला, तर वैयक्तिक जीवनही दुःखी होते आणि व्यक्तीमत्त्वाचा विकासही खुंटतो. स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाच्या प्रक्रियेसाठी भारतातील अनेक राज्यांतून सनातनच्या रामनाथी, गोवा येथील आश्रमात अनेक साधक येतात. आश्रमातील ‘स्वयंपाक-विभाग’ हा या प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे; कारण स्वयंपाक-विभागातील पू. रेखा काणकोणकर आणि सौ. सुप्रिया माथूर साधकांना प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करतात अन् स्वयंपाक-विभागात सेवा करण्याच्या माध्यमातून साधकांना प्रक्रियेसंबंधीचा प्रायोगिक भागही शिकता येतो. यामुळे शेकडो साधक काही मासांतच (महिन्यांतच) योग्य साधना करायला लागतात.

पू. रेखा काणकोणकर आणि सौ. सुप्रिया माथूर साधकांना प्रक्रियेविषयीच्या सत्संगात काय मार्गदर्शन करतात, साधकांकडून प्रक्रिया कशी राबवून घेतात, याचे अनेक साधकांना कुतूहल असते. वर्ष २०१६ मध्ये मार्च, एप्रिल आणि मे या तीन मासांत सनातनच्या ज्ञानप्राप्तकर्त्या साधिका कु. मधुरा भोसले यांना सौ. सुप्रिया माथूर यांनी घेतलेल्या अशा सत्संगांना उपस्थित रहाण्याची संधी मिळाली. सौ. सुप्रिया माथूर यांचे मार्गदर्शन कु. मधुरा भोसले यांनी प्रस्तुत ग्रंथाच्या स्वरूपात सुंदर प्रकारे संकलित केले आहे. त्यातून सर्वच साधकांना स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाच्या प्रक्रियेची दिशा मिळेल. बर्‍याच साधकांना प्रक्रिया शिकण्याची तीव्र इच्छा असूनही काही अडचणींमुळे रामनाथी आश्रमात येऊन प्रक्रिया शिकता येत नाही. अशांना हा ग्रंथ निश्चितच पुष्कळ उपयोगी ठरेल. केवळ अनेक वर्षांपासून साधना करणार्‍यांसाठीच नव्हे, तर जिज्ञासू आणि नवीन साधक यांच्यासाठीही हा ग्रंथ म्हणजे, जीवनात आनंदप्राप्तीचा मार्ग दर्शवणारा दीपस्तंभच ठरेल.

सौ. सुप्रिया माथूर यांना वाईट शक्तींचा तीव्र त्रास आहे. असे असतांनाही त्यांच्यातील ‘सर्व साधकांना साधनेत पुढे घेऊन जाण्याची तळमळ आणि भाव’ या गुणांमुळे त्या साधकांना उत्तम मार्गदर्शन करून त्यांच्यात पालट घडवून आणत आहेत. हे खरोखरच कौतुकास्पद आहे.

सनातनच्या ‘स्वभावदोष आणि अहं यांचे निर्मूलन’ या मालिकेतील इतर ५ ग्रंथ आणि ‘अहं-निर्मूलन’ याविषयीचा १ ग्रंथ हेही उपलब्ध आहेत. त्यांमध्ये त्या त्या विषयाची मूलभूत तात्त्विक आणि प्रायोगिक माहिती दिली आहे. वाचकांनी आधी त्या ग्रंथांचा अभ्यास केल्यास त्यांना प्रस्तुत खंड अधिक चांगल्या प्रकारे समजेल; कारण प्रस्तुत खंडामध्ये प्रामुख्याने ‘स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाची प्रक्रिया राबवत असलेल्यांना ती अधिक परिणामकारकपणे आणि नेमकेपणाने कशी राबवावी’, याचे मार्गदर्शन केले आहे.

‘या खंडाच्या अभ्यासाने सर्वच साधकांना प्रक्रिया चांगल्या प्रकारे राबवता येऊन त्यांचे जीवन आनंदी बनो आणि त्यांना शीघ्र ईश्वरप्राप्ती करून घेता येवो’, ही श्री गुरुचरणी प्रार्थना !’

**– (परात्पर गुरु) डॉ. आठवले (९.९.२०१७)**

## सनातनच्या ‘स्वभावदोष आणि अहं यांचे निर्मूलन’ या मालिकेतील अन्य ग्रंथ !

- स्वभावदोष (षड्‍रिपू)-निर्मूलनाचे महत्त्व आणि गुण-संवर्धन प्रक्रिया
- स्वत:तील स्वभावदोष कसे शोधावेत ?
- स्वयंसूचनांद्वारे स्वभावदोष निर्मूलन
- स्वभावदोष-निर्मूलनासाठी बौद्धिक आणि कृतीच्या स्तरांवरील प्रयत्न
- स्वभावदोष-निर्मूलनासाठी आध्यात्मिक स्तरावरील प्रयत्न

# अनुक्रमणिका


१. स्वभावदोष निर्माण होण्याची काही कारणे १२

२. साधनेतील अडथळे १३

३. विविध स्वभावदोषांचे विश्लेषण १६

४. स्वभावदोषांच्या मागे अहं दडलेला असणे ३०

५. स्वभावदोषांमुळे होणारी हानी ३०

६. अहं ३१

७. चुका होणे आणि स्वीकारणे ४९

८. सनातनच्या आश्रमातील 'युवा साधना शिबिरा'त सहभागी झालेल्या साधिकेने 'स्वभावदोष-निर्मूलन' याविषयी व्यक्त केलेले विचार ५८

९. 'नामजप, सत्संग, सत्सेवा इत्यादी साधना केल्यामुळे होणाऱ्या स्वभावदोष अन् अहं यांच्या निर्मूलनापेक्षा साधनेला 'स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाच्या प्रक्रिये'ची जोड दिल्यामुळे स्वभावदोष अन् अहं यांचे निर्मूलन अधिक प्रमाणात होते', हे दर्शवणारी 'महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया'ने केलेली पाहणी(सर्व्हे) ५९

१०. 'स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनाची प्रक्रिया' राबवल्यामुळे साधकांना झालेला लाभ दर्शवणारी 'महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया'ने 'यू.टी.एस्. (युनिव्हर्सल थर्मो स्कॅनर)' या उपकरणाद्वारे केलेली वैज्ञानिक चाचणी ६४



**सनातनचे ग्रंथ नियमितपणे खरेदी करणाऱ्या वाचकांना विनंती !**

सनातनच्या नवीन ग्रंथांविषयी जाणून घ्यायचे असल्यास संपर्क करा –

**prasarsahitya@gmail.com** किंवा **भ्रमणभाष :** ९३२२३१५३१७